# खेडशिवापूर-कोंढणपूर रस्ता दुरुस्तीची मागणी

खेड-शिवापूर, दि.१६ (वार्ताहर)- खेड-शिवापूर ते कोंढणपूर दरम्यानच्या रस्त्याची संततधार पावसामुळे दुरवस्था झालेली असून या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते व श्रीरामनगरचे सरपंच चंद्रकांत बांडे-हवालदार यांनी केली आहे.

सासवड, खेड-शिवापूर कोंढणपूर अवसरवाडी मार्गे सिंहगड, डोणजे व पुढे पुणे असा मार्ग नियोजित आहे. यामुळे पर्यटकांच्या दृष्टीने हा मार्ग सोयीस्कर होणार आहे. खेड-शिवापूर ते कोंढणपूर रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर झाले असून, कोंढणपूर बाजूने संबंधित ठेकेदाराने रस्त्याचे काम केले आहे. परंतु पुलाची कामे अपूर्ण आहेत. रस्त्याच्या कामासाठी रस्त्यालगत खडीचे ढीग टाकण्यात आले आहेत. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे रस्ता रुंदी व डांबरीकरणाचे काम रेंगाळले आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी गटारांची कामे केली जातात. परंतु यावर्षी तुरळक ठिकाणीच गटारांतील माती काढून तात्पुरती दुरुस्ती करण्याचा संबंधित खात्याने प्रयत्न केला आहे. या मार्गावर गटारांची दुरुस्ती केली नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरून वाहत आहे. रस्त्यावर लहान-मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पाणी साचल्याने खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहने मंद गतीने चालतात. या ठिकाणी वेळप्रसंगी अपघात होण्याची शक्यता असून एखाद्याच्या जीवितास धोका होण्याची शक्यता आहे. खेडशिवापूर ते कोंढणपूर हा रस्ता पुणे-सातारा महामार्गाला जोडलेला असून या ठिकाणी लहान-मोठे कारखाने आहेत. तसेच या मार्गावर श्रीरामनगर, शिवापूर, कुसगाव, रांजे, आर्वी, कोंढणपूर, रहाटवडे, अवसरवाडी, कल्याण ही गावे व वाड्या-वस्त्या असून या मार्गावर सतत वाहनांची वर्दळ असते.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.